स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ , नांदेड

शोधप्रबंध आराखडा (synopsis)

मानवविज्ञान शाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवी साठी सादर करण्यात येणाऱ्या शोध प्रबंधाचा आराखडा.

"भारताच्या आण्विक धोरणाचे वास्तव आणि जागतिक राजकारणातील स्थान : एक विश्लेषण"

संशोधक

रश्मी सखाराम बर्जे

एम.ए.,सेट (राज्यशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. दत्ता एम. कुंचेलवाड

सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग

नागनाथ कला वाणिज्य व विज्ञान, महाविद्यालय, औंढानागनाथ, जी. हिंगोली

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज , नांदेड

२०२३

“भारताच्या आण्विक धोरणाचे वास्तव आणि जागतिक राजकारणातील स्थान : एक विश्लेषण”

1.1 प्रस्तावना :

आजपर्यंतच्या मानवी शोधांमध्ये अणुउर्जेचा शोध अतिशय महत्वपूर्ण मानला जातो. मूलतः त्याचा वापर मानवी हितासाठी करणे अपेक्षित आहे परंतु राष्ट्राच्या शक्तीचा घटक म्हणून इतर राष्ट्रांवर कुरघोडीसाठी वापर होताना दिसतो आहे. यामुळे जगावर दूरगामी परिणाम झाले. यावरून जागतिक राजकारणाची एक वेगळी रूपरेषा रेखाटली गेली असे म्हणता येईल. मूलतः महाकाय अनू ऊर्जा ही मानवी जीवन सुखी करण्यासाठी उपयोगात आणता येईल अशी स्वप्ने शास्त्रज्ञ पाहत होते. परंतु दुर्दैवाने हा शोध लागला तेव्हा दुसरे महायुद्ध निर्णायक टप्प्यावर आले होते. छोटासा जपान देश अमेरिका-इंग्लंड-रशिया यांसारख्या बलाढ्य देशांना जुमानत नव्हता. म्हणून जपानला पराभूत करण्याकरिता अमेरिकेने जपानवर ६ आणि ८ ऑगस्ट १९४५ रोजी हिरोशिमा आणि नागासाकी या दोन शहरांवर अणुबॉम्बचा वर्षाव केला. जपानची दोन्ही शहरे बेचिराख झाली आणि जगाने अनुशक्तीचा विध्वंस पाहीला. त्यामुळे अणू उर्जेविषयी एक विलक्षण ओढ निर्माण झाली. प्रत्येक राष्ट्र अणूउर्जेद्वारे बलशाली होण्याचे स्वप्न पहाते तर बहुतांश राष्ट्रे अणूउर्जेचा वापर शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नाने चालू करतात पण आज तसे दिसत नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्ती पर्यंत जगात केवळ अमेरिकेकडेच अण्वस्त्रे होती. परंतु १९४५ नंतर जागतिक राजकारणाचे स्वरूप बदलले. भारताचे आण्विक धोरण हा आंतरराष्ट्रीय स्तरावर नेहमीच चर्चेचा विषय राहीला आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार “ पंडित जवाहरलाल नेहरू ” यांनी अणुशक्तीचे महत्व ओळखले आणि भारताला अण्वस्त्र संपन्न होण्यासाठी आखणी केली.

भारताच्या आण्विक धोरणाला १९६० च्या दशकात गती आली; कारण १९६९ मध्ये अनेक वर्षांच्या चर्चेनंतर अण्वस्त्रधारी देशांनी अण्वस्त्र प्रसारबंदी करार (सीटीबीटी) अमलात आणला. कराराचा मुख्य मुद्दा होता, की ज्या देशांकडे अणवस्त्रे आहेत त्यांनाच फक्त अण्वस्त्रांचा विकास आणि चाचण्या करण्याची अनुमती असणार होती याउलट इतर देशांनी अण्वस्त्रे धारण करू

नये; म्हणजे अण्वस्त्रांचा अधिक प्रसार वाढणार नाही हा मुद्दा या करारात मांडला गेला. भारताने हा करार पक्षपाती ठरवत (सीटीबीटी) या करारात समाविष्ट होण्यास नकार दिला.

आण्विक क्षेत्रावर स्वतःची मक्तेदारी समजणाऱ्या राष्ट्रांना इतरांची अण्वस्त्र संपन्नता रुचत नव्हती, म्हणून अण्वस्त्र प्रसार थांबवा यासाठी १९६८ ला ‘ अनुप्रसार करार अस्तीत्वात आणला गेला. भारताने मात्र या करारावर स्वाक्षरी केली नाही कारण या करारात भारत आणि चीन दरम्यान सीमावाद असूनही त्यासंदर्भात चिन विषयी कोणतीही तरदूर नव्हती आणि दुसरी गोष्ट म्हणजे ज्या विधायक कार्यासाठी अणुशक्तीचा वापर भारत करू इच्छित होता ते या करारानंतर भारताला करता येणार नाही याची भीती भारताला होती. म्हणून भारताने १८, मे १९७४ ला पहिली अणू चाचणी केली आणि अण्वस्त्रधारी देशांच्या यादीत आपले नाव सामाविष्ट केले.

जागतिक निःशस्त्रीकरणाच्या दृष्टीने दुसरे पाऊल सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार कराराच्या माध्यमातून टाकण्यात आले. भारतानेयाही कराराला विरोध केला कारण भारत अणुशक्ती कडे राष्ट्रीयहित आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून बघतो. याला विरोध दर्शवून तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुढाकारातून १९९८ ची अनू चाचणी केली.

(सीटीबीटी व एनपीटी) या दोन्ही मध्ये अद्याप भारत सदस्य नसला तरी आय.ए.ई.ए. - अंतराष्ट्रीय अनू ऊर्जा एजन्सी जी अनू ऊर्जेच्या शांततापूर्ण वापरला प्रोत्साहन देते आणि लष्करी कारणांसाठी त्याचा वापर करण्यास विरोध करते याचा भारत सदस्य राष्ट्र आहे. भारताने अलिप्ततावादी धोरणाचा स्वीकार केला. जगात शांतता निर्माण व्हावी यासाठी आपण नेहमीच प्रयत्नशील आहोत असा भारताचा अट्टाहास आहे.मात्र १९६२ च्या चीन आक्रमणानंतर भारताने लष्करीदृष्टया सक्षम होण्यासाठी, आपली संरक्षणसिद्धता जगाला दर्शविण्यासाठी १९७४ व १९९८ मध्ये राजस्थानातील पोखरण येथे अणुचाचण्या केल्या.

अर्थात आपला हा अणू कार्यक्रम शांततेसाठी आहे. ज्या राष्ट्रांकडे अण्वस्त्रे नाहीत, त्या राष्ट्रांबरोबर युद्ध झाल्यास अशा राष्ट्राविरुद्ध भारत अण्वस्त्रे वापरणार नाही, तसेच इतर देशांबरोबर युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास युद्धात अण्वस्त्रांचा वापर भारत प्रथम करणार नाही, हे आपण आधीच जाहीर केले आहे. अण्वस्त्रांचा वापर प्रथम करायचा नाही (नो फर्स्ट युज - एनएफयू), हा सिद्धांत भारताने २००३ मध्ये स्वीकारला. केवळ राष्ट्रहित, स्वसंरक्षण या एवढ्याच मर्यादित उद्दिष्टांसाठी भारत अण्वस्त्रधारी राष्ट्र बनला, हाच भारताच्या 'एन एफ यू' धोरणाचा गाभा राहिला. देशाच्या अस्तितत्वाला असलेला अणुहल्ल्याचा धोका, हे कारण त्यासाठी पुरेसे होते.

भारताने एक सर्वसमावेशक आण्विक सिद्धांत विकसित केला जो त्याच्या धोरणात्मक गरजा , सुरक्षा व जागतिक भू- राजकरणावरील आकांक्षा प्रतिबिंबित करतो. अण्वस्त्रधारी राष्ट्र म्हणून भारताची धोरणात्मक भूमिका ही सर्वसमावेशक अणू धोरणाशी जवळून जोडली आहे. राष्ट्रहित संरक्षण बरोबरच प्रादेशिक स्थिरता राखण्यात आणि जागतिक सूरक्षेमध्ये देत असलेले योगदान यांमुळे भारताचे आण्विक धोरण अनुपुरवठादार राष्ट्रांना देखील सकारात्मक वाटू लागले आहे. म्हणून भारताबरोबर नागरी अनुसहकार्याचे करार होऊ लागले आहेत.

ऊर्जा क्षेत्रातील असमर्थता हा राष्ट्र विकासातील एक मोठा अडथळा आहे. महासत्तेचे स्वप्न साकारण्यासाठी अणुशक्तीद्वारे ऊर्जा निर्मितीचे प्रयत्न करून राष्ट्रीय विकास दरात वृद्धी साधण्याचा तसेच जागतिक राजकारणात तिसऱ्या जगाचा एक बळकट स्तंभ बनण्याचा प्रयत्न भारत करत आहे. हाच भारताच्या आण्विक धोरणाचा विधायक पैलू आहे.

त्यामुळे, भारत जागतिक राजकारणात चर्चेचा विषय ठरत आहे. त्यातच अंतराळक्षेत्रात चंद्राच्या दक्षिणध्रुवावर यानाची यशस्वी चाचणी करून वैज्ञानिक क्षेत्रात एक दबदबा निर्माण केला आहे. आण्विक आणि वैज्ञानिक प्रगती खऱ्या अर्थाने महासत्ताक दिशेने चालणारे पाऊल ठरत आहे .

1.2 संशोधन साहित्याचा आढावा :

भारताचे आण्विक धोरण आणि त्यासंबंधी विविध विचार अनेक लेखकानी मांडलेले आहेत. संशोधन करीत असताना विवध संशोधन साहित्य, त्यात मिळालेले विविध तथ्य व संकल्पना याचा चिकिस्तक् अभ्यास करावा लागतो. भारत स्वातंत्र्य होण्या अगोदर पासून भारताच्या सुरक्षेसंबंधीचे विविध पैलू आपल्याला पंडित जवाहरलाल नेहरू यांविषयी लिहिलेल्या ग्रंथात आढळतात त्याच बरोबर दुसऱ्या महायुद्धात झालेली जापानची हानि आणि अमेरिका- रशिया यांचा जागतिक राजकारणात वाढता प्रभाव, शेजारील राष्ट्र व सिमावाद यामुळे निर्माण झालेला धोका ह्या घटना भारताला अणू कार्यक्रम हाती घेण्यास कारणीभूत ठरतात असे काही संदर्भाच्या आधावर म्हणता येईल.

तत्कालीन झालेल्या घटना आणि त्यावर भारताची प्रतिक्रिया यांचा आढावा घेऊन भारताच्या आण्विक धोरणाचा लघु परिचय हर्ष पंत यांनी मांडलेला दिसतो. (संदर्भ- oxfordindia short introduction to india’s nuclear policy, 2018)

डॉ. होमी भाभा यांना भारतीय आण्विक धोरणाचा शिल्पकार म्हटल्या जाते, त्याच बरोबर ‘ शक्तिशाली भारताचे संजीव चित्र साकारले ’- डॉ. होमी सेठना,(माजी अध्यक्ष अणू ऊर्जा विभाग), यांनी एका भाषणात डॉ. होमी भाभा यांच्या केलेल्या कार्याबद्दल मत व्यक्त केले.

दिलीप साळवी, यांनी भारताच्या अणुकार्यक्रमात होमी भाभा यांचा कसा सिंहाचा वाटा आहे हे आपल्या लिखानाच्या माध्यमातून जगापुढे ठेवले.(संदर्भ- होमी जे भाभा: आर्किटेक्ट ऑफ न्यूक्लियर इंडिया, २००४)

रेशमी काझी, यांनी आपल्या (संदर्भ) इंडिया इन ग्लोबल न्यूक्लियर गवर्नेस, २०१३ या ग्रंथाच्या माध्यमातून आज जागतिक आण्विक राजकारणातील भारताचे स्थान व स्थितीचा अभ्यास केला संशोधनात याचा आढावा घेतला आहे.

भारताच्या राजकीय परिवर्तनाचा परिणाम भारतीय धोरणावर होत आहे हे सिताकान्त मिश्रा यांनी दाखवून दिले. (संदर्भ-‘परमाणु राजकारण: भारतीय राजकीय पक्ष आणि अण्वस्त्रे , २०१५)या ग्रंथाच्या माध्यमातून राजकीय पक्षांचा आण्विक धोरणावर कसा परिणाम होतो ही सांगितले.

या पुस्तकात भारताच्या भविष्यातील अण्वस्त्र धोरणाच्या रुपरेषेचा ऊहापोह करण्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा, देशांतर्गत राजकारण, आणि अप्रसार शासन यांचा अण्वस्त्रांचा भूमिकेवर, विशेषतः तिन्ही पक्षांच्या धोरणांमधील कल ओळखण्याचा प्रयत्न केला आहे.

याच बरोबर आज घडीला जागतिक राजकारणात वेगाने बदल होताना दिसतात जागतिक महासत्तांपैकी एक महासत्ता बणण्याचे स्वप्न असणाऱ्या भारताचे देखील त्यादृष्टीने प्रयत्न पाहायला मिळतात. यासमोर असणारी आव्हाने आणि भारताचे प्रयत्न या संदर्भात विविध लेखक व विचारवंत आपले विचार मांडताना दिसतात. सुहास पळशिकर , सुमित गांगुली यांसारखे संपादक सद्य परिस्थिती नुसार भारताच्या धोरणात व जागतिक स्तरावर कुठले बदल होत आहेत या संदर्भात आढावा देत असतात.

आशा प्रकारे एकंदरीत सुरू झालेला आण्विक प्रवास ते आज बदलत्या काळ व समस्या यांना लक्षात घेऊन होत असलेले प्रयत्न, त्याची निष्पती, या सर्वांची रूपरेखा विविध संदर्भ साहित्यातून मिळते. याचे योग्य प्रकारे वाचन व त्यातून मिळालेल्या निष्कर्ष व समस्या यांना योग्य शिफारशी करण्याचा प्रयत्न संशोधनाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

1.3 संशोधन विषयाची निवड :

भारताच्या आण्विक धोरणबद्दल अनेकांना कुतूहल आहे. कारण त्यातील संदिग्धता अभ्यासकांना निश्चित निष्कर्ष काढू देत नाही. भारताची विदेश नीती शस्त्रास्त्र स्पर्धेला विरोध करून आंतरराष्ट्रीय शांततेचा पुरस्कार करणारी आहे, तरी देखील एक आधीसत्ता म्हणून मान्यता मिळवण्याच्या वाटचालीत भारताने आपला भक्कमपणा अबाधित ठेवण्यासाठी अण्वस्त्र उर्जेला महत्व कशाप्रकारे दिले तसेच याची धोरण निश्चिती व अमलबजावणी कशाप्रकारे केली याबद्दल संशोधन करण्यासाठी हा विषय निवडला आहे.

२१ व्या शतकात भारत एक महासत्ता म्हणून पुढे येतो आहे. भारतात असणाऱ्या थोरीयम चे साठे आणि नुकतेच काश्मीर येथे मिळालेले यूरेनीयम चे साठे ही भारताच्या अणू ऊर्जेच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाचे आहेत. देशाचा अंतर्गत व बाह्य विकास हा प्रमुख हेतु असला तरी सद्यस्थित जागतिक राजकारणात होणारे बदल व त्याचा भारतावर होणारा परिणाम. यामुळे हा विषय भारताच्या व आंतरराष्ट्रीय दृष्टीने उपयुक्त बनला आहे.

यासोबतच, आपल्या आण्विक धोरणाच्या माध्यमातून जागतिक राजकारणात निश्चित केलेले स्थान व सद्यस्थित त्याचे महत्व आणि भविष्यासाठी होणारी जडणघडण या संदर्भात एक चिकित्सक अभ्यास करणे हा या विषयामागील संशोधनाचा हेतु आहे.

1.4 संशोधनाचे क्षेत्र:

भारताच्या अण्वस्त्र धोरणाचा उद्देश्य मूलतः कोणत्याही राष्ट्राला धमकावण्याचा किंवा हल्ला करण्याचा नसून देशाच्या सार्वभौमत्वाचे आणि सीमा रक्षण करण्याचा होता. भारताची अण्वस्त्रे ही भारताविरुद्ध अण्वस्त्रांचा धोका रोखण्यासाठी आहेत. आशियाखंडातील एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून भारताचे अस्तीव जपण्यासाठी एक आण्विक धोरण आखले व कालानुरूप त्यात बदल देखील करतो आहे. इंटरनॅशनल अटॉमिक एनर्जी एजन्सी च्या प्रशासकीय मंडळात भारत एक प्रमुख देश आहे,

आज घडीला जागतिक राजकारणात आपला प्रभाव वाढविणारा भारत आण्विक शक्तिला देश विकासाच्या दृष्टीने देखील महत्व देताना दिसतो आहे. जेव्हा भारताने आपले "दीर्घकालीन कमी उत्सर्जन विकास धोरण, यूएनएफसीसीसी " मध्ये केले सादर तेव्हा भारताच्या आण्विक धोरणाचा एक नवा पैलू जगासमोर आला. ज्यात आण्विक धोरणाची व्याप्ती आणि महत्व शाश्वत पर्यावरण विकास आणि त्यामाध्यमातून देश विकास याचा संगम यात दिसून आला आहे तसेच भारताच्या आण्विक क्षेत्राशी निगडीत संशोधन शीर्षक असला तरी भारत आणि इतर राष्ट्रातील आण्विक शक्तीची तुलना, संयुक्त राष्ट्र संघटनेची चौकट इ..विविध संस्था समूहाचा सारांश रूपाने अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे. आशाप्रकारे संरक्षणसाठी सुरू झालेला हा स्वहितदर्शी आण्विक धोरणाचा प्रवास आज बदलत्या काळानुसार आणि गरजे नुसार भारताबरोबर जागतिक स्तरावर देखील आपली व्याप्ती वाढवताना दिसतो आहे याचा संक्षिप्त आढावा संशोधनात घेण्यात येणार आहे. म्हणून या विषयाची व्याप्ती वरील प्रमाणे विस्तारीत आहे ही संशोधन पूर्ण होत असताना दिसून येईल.

1.5 संशोधनाची उद्दिष्टे :

1. भारताच्या आण्विक धोरणाची मूळ संकल्पना समजून घेणे.

2. आण्विक धोरणाचा इतिहास आणि प्रवास याची चिकित्सा करणे.

3. भारताच्या आण्विक धोरणाच्या फलनिष्पतीचा आढावा घेणे.

4. आण्विक धोरनाबाबत जागतिक राजकारणातील महत्वाची राष्ट्रे आणि संघटना यांच्या भूमिका व परिणामांचा आढावा घेणे.

5. अणूऊर्जा आणि सद्यस्थितीतील पर्यावरणा चे धोके व उपाय यांचा अभ्यास करणे (आण्विक ऊर्जा अभिशाप की एक वरदान)

6. भारताची सद्यस्थितीत जागतिक राजकारणातील अण्वस्त्र संदर्भात भूमिका तपासणे.

7. आण्विक धोरणासंदर्भात भारताच्या व विविध राष्ट्रांच्या भूमिकेबाबत भविष्याचा वेध घेणे, सुधारणात्मक उपाय सुचवणे.

1.6 संशोधनाची गृहितके :

कोणत्याही संशोधन समस्येवर अभ्यास करण्यासाठी संशोधकाला काही गृहितके निश्चित करावी लागतात. गृहीतकृत्यामुळे संशोधन कार्याला एक निश्चित दिशा मिळत असते. 'संशोधन समस्येचे एक संभाव्य उत्तर वा स्पष्टीकरण म्हणून मांडण्यात आलेले विधान म्हणजे गृहितकृत्य होय. ही स्पष्टीकरणे समस्ये ची वास्तविक उत्तरे आहेत की नाही हे पाहण्यासाठी संशोधन संचालित केले जाते. त्या अनुषंगाने काही गृहितके निश्चित केली आहेत.

1. **भारताने स्वतंत्र व सार्वभौम वाटचाल करण्यासाठी आण्विक शक्तीचा अवलंब केला आहे.**
2. **आशिया खंडातील एक शतीशाली राष्ट्र म्हणून भारताचे अस्तित्व जपण्यासाठी आण्विक धोरण आखले आहे.**
3. **वाढती शस्त्र स्पर्धा ही देखील भारताला आण्विक धोरण स्वीकारण्यास कारणीभूत ठरली आहे.**
4. **आण्विक शक्तीच्या माध्यमाने देशातील मानवसंसाधनाचा विकास करण्याचा मानस दिसून येतो.**
5. **आशिया खंडात भारत एक शक्तिशाली देश बनला ज्याचा जागतिक राजकारणावर देखील प्रभाव झाला.**
6. **आण्विक शक्तीच्या बळावर आशिया खंडात व जगात शांतता रुजवण्याचा हेतु आहे.**

1.7 संशोधन पद्धती :

सदरील विषयानुषंगाने संशोधन करत असताना संशोधन पद्धतीच्या चौकटीत राहून संशोधन केले तर ते संशोधन दर्जेदार व समाज उपयोगी ठरते म्हणून खालील संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

अ)अभ्यास पद्धती -

कोणत्याही विषयाचा अभ्यास करताना शास्त्रीय स्वरूपात मांडणी करावी लागते संशोधनात नित्य व नव्या दृष्टिकोण महत्वाचा असतो. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संशोधन विषय अभ्यासताना अनेक पैलू बाबत शास्त्रीय विवेचन करणे अगत्याचे ठरते. प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्यायनासाठी संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषणात्मक पद्धतीचा उपयोग केला जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात येईल.

ब)तथ्य संकलन -

a) **प्राथमिक स्त्रोत- प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलन करण्यासाठी मुलाखत, प्रश्नावली, निरीक्षण इत्यादि माध्यमांचा वापर करण्यात येईल.**
b) **द्वितीयक स्त्रोत - संदर्भग्रंथ, अहवाल, दस्तऐवज, शोधपत्रिका , नियतकालिके , वर्तमानपत्रे , इंटरनेट, इत्यादि माध्यमांचा तथ्य संकलन करण्यासाठी वापर करण्यात येईल.**

1.8 संशोधन विषयाची मर्यादा :

प्रस्तुत संशोधन कार्यात वस्तुनिष्टता येण्यासाठी व संशोधन वास्तवप्रत जाण्यासाठी संशोधनाचे क्षेत्र निश्चित करावे लागते. संशोधनाचे मर्यादित क्षेत्र हे वास्तवप्रत पोहोचवते म्हणून शोध निबंधातील संशोधनाच्या कार्याला काही मर्यादा आहेत भारतीय आण्विक धोरणाचा पंडित नेहरू ते पं. नरेंद्र मोदी यांच्या कालखंडा पर्यंतचा थोडक्यात आढावा घेणे , तसेच हा विषय जागतिक राजकारणातील भारताणे आण्विक शक्तीचा संहारक आणि शांतीमय विकास या विचारांच्या जोरावर मिळवलेले स्थान या पुरताच मर्यादित राहील. संशोधन कार्यात सुटसुटीत विषय मांडणी आणि विषयातील नेमकेपणा संशोधनाची दिशा स्पष्ट व्हावी म्हणून संशोधनाची मर्यादा ठरवली आहे.

भारतातील आण्विक धोरणाची मांडणी करण्यात येत असली तरी, त्याचे संदर्भ जागतिक पातळीवरील असणार आहेत. शिवाय, हा विषय कळीचा असल्यामुळे व संरक्षनाच्या क्षेत्रात समाविष्ट असल्याने महत्वाची माहिती सार्वजनिक केली जात नाही. म्हणून ही माहिती संकलित करताना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे.

1.9 संशोधन आराखडा :

कोणत्याही संशोधकापुढे संशोधन करताना निश्चित स्वरूपाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून संशोधकाला आपल्या संपूर्ण संशोधनाची आखणी व मांडणी करावी लागते. कारण आशा पूर्वनियोजित मंडणीतून किंवा निर्णयामुळे संशोधन भटकत नाही व योग्य निष्कर्षांपर्यन्त पोहोचण्यास मदत होते. प्रस्तुत संशोधनाच्या शोध प्रबंधाचा आराखडा किंवा प्रकरण रूपरेखा खालील प्रमाणे आहे.

प्रकरण १ : प्रस्तावना

पहिले प्रकरण प्रस्तावना हे आहे. यात संशोधन विषयाच्या अनुषंगाने थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. पूर्व संशोधन साहित्याचा आढावा , संशोधनाचा हेतु , संशोधनाचे महत्व , संशोधनाची उद्दिष्टे , संशोधनाची गृहितके , संशोधन मर्यादा , संशोधन पद्धती , संशोधन आराखडा इत्याची चा समावेश करण्यात आला आहे.

प्रकरण २ - भारताच्या आण्विक धोरणाचा ऐतिहासिक आढावा.

संशोधन विषयाचे दुसरे प्रकरनात भारताचा आण्विक कार्यक्रम जो १९४० च्या उत्तरार्धात , होमी जे भाभा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झाला त्यात भारताला स्वतःचे आण्विक धोरण बनवण्यासाठी कुठली परिस्थिती कारणीभूत ठरली यामागचा मूलभूत हेतु, त्याच बरोबर तत्कालीन धोरणे व विचार यांचा तपशीलवार आढावा घेण्यात आला आहे.

प्रकरण ३ -जगातील विविध राष्ट्रांचे आण्विक धोरण आणि त्याचे परिणाम.

दुसऱ्या महायुद्धात झालेली जपान ची दशा झाली व त्यानंतर जेते राष्ट्रांनि आण्विक शस्त्राना प्रचंड महत्व दिले . त्यामुळे जगात यू. के. (१९५२) , फ्रांस (१९६०) , चीन (१९६४) यांनी देखील अण्वस्त्रे विकसित केली परिणामी जागतिक तनाव वाढीत क्षितयुधबरोबरच शस्त्रास्त्र स्परधा देखील सुरू झाली जी आज एक मोठे आव्हान मणून जागतिक शांतते पुढे उभे राहिले आहे. यासाठी विविष राष्ट्रांचे आण्विक धोरण , त्याचे नेमके हेतु व सद्यस्थिती त्याचे महत्व याची चिकिस्ता संशोधनात करण्यात आली आहे.

प्रकरण ४ - आण्विक कार्यक्रमात संयुक्त राष्ट्र संघटनेची भूमिका.

आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा हा संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेमागचा उद्देश होता .हे पूर्ण करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने अण्वस्त्र वापर कमी करणे,अण्वस्त्र नष्ट करणे यासाठी अण्वस्त्र निशास्त्रीकरण व आपप्रसार कायदा केला. त्याच बरोबर अण्वस्त्रच्या प्रतिबंधावरील करार केला तसेच २६ सप्टेंबर हा संपूर्ण अण्वस्त्र निर्मूलनासाठी अंतराष्ट्रीय दिवस म्हणून ठरवला आशा प्रकारे अनेक धोरणात्मक उपाय केले या संदर्भात माहिती या प्रकरणात देण्यात आली आहे.

प्रकरण ५ - आण्विक शक्तीचा उपयोग आणि परिणाम.

आज जागतिक तापमानवाढ ही अत्यंत मोठी व महत्वाची समस्या बनली आहे. कमी अधिक प्रमानात प्रतेक देशावर याचे हणिकारक परिणाम जाणवू लागले आहेत. या मागील महत्वाचे कारण म्हनजे कार्बन उत्सर्जन आहे. अणू ऊर्जा ही मोठ्या प्रमाणात कार्बन मुक्त वीजनिर्मिती करू शकते त्याच बरोबर हवेच्या गुणवत्तेचे संरक्षण करून प्रदूषण मुक्त ऊर्जा निर्मिती करू शकते.यामुळे आज अणू ऊर्जेला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. आशा प्रकारच्या शाश्वत ऊर्जा निर्मितीच्या माध्यमातून पर्यावरण हानी टाळता येते व याचा विविध माध्यमातून मानवी तसेच राष्ट्र विकासासाठी कसं उपयोग केला जातो आहे याचा संक्षिप्त आढावा या प्रकरणात घेतला आहे.

प्रकरण ६ - भारताचा अनूऊर्जा कार्यक्रम आणि भवितव्य.

भारताचा आण्विक कार्यक्रम (भारताची भूमिका) व काळानुसार त्यात कोणते बदल शक्य आहेत याचा विचार या प्रकरणात करण्यात आला आहे . भारताच्या आण्विक धोरण व भूमिकेमुळे भारताला एक वेगळी ओळख निर्माण झाली त्याचा जागतिक राजकारणावर देखील परिणाम झाला याचा प्रत्यय आपल्याला 'भरत एक बलवान राष्ट्र' म्हणून समोर येण्याच्या माध्यमातून दिसून येतो . त्याचबरोबर भारताला भविष्यात येणारे आव्हाने , जागतिक राजकारणात आपले स्थान मजबूत करण्यासाठी करावे लागणारे प्रयत्न इत्यादि बाबीचा ऊहापोह या प्रकरण्यात करण्यात आला आहे.

प्रकरण ७ –सारांश आणि निष्कर्ष / शिफारशी

संशोधन विषयाचे शेवटचे प्रकरण हे निष्कर्ष असून वरील सर्व प्रकरण अभ्यासातून जे निष्कर्ष हाती लागतील त्याची विस्ताराने नोंद येथे घेण्यात येईल. यात भारताचे आण्विक धोरण व बदलते जागतिक राजकारण याचा एकंदरीत आढावा घेऊन भारत व विविध देशांच्या भूमिकेबाबत काही सुधारणात्मक शिफारशी याची मांडणी करण्यात येईल.

उपरोक्त संशोधन अराखड्यात संशोधन कालावधी दरम्यान उपलब्ध होणाऱ्या साहित्य व माहितीनुसार बदल होऊ शकतो.

1.10 संदर्भसूची (References) :

संशोधन करत असताना खालील संदर्भ सूचीचा उपयोग करण्यात येईल.

1) सरकारी दस्तावेज आणि संकेतस्थळ

2) संदर्भग्रंथ / साहित्य-

1. सी. आर. कोठारी आणि गौरव गर्ग , संशोधन पद्धती: पद्धती आणि तंत्रे , न्यू एज इंटरनॅशनल पब्लिकेशन , मार्च २०१६
2. डॉ. संतोष खिराडे आणि जयश्री पाटील, संशोधन पद्धती व संशोधन प्रकाशनाची नितीतत्वे , प्रशांत पब्लिकेशन , फेब्रुवारी २०२१
3. हर्ष पंत आणि योगेश जोशी , ऑक्सफोर्ड इंडिया लघु परिचय : भारताचे आण्विक धोरण , ओ यू प भारत प्रकाशन , ऑगस्ट २०१८
4. डॉ. शैलेन्द्र देवळाणकर , समकालीन जागतिक राजकारण , विद्या बुक्स पब्लिशर्स , औरंगाबाद ,२०१०
5. डॉ. शैलेन्द्र देवळाणकर , भारतीय परराष्ट्र धोरण: सातत्य आणि स्थित्यंतरे , प्रतिमा प्रकाशन , पुणे ,२०१०
6. पद्म सिंह , भारत की परमाणु नीती और भारत - अमेरिका संबंध, अर्जुन पब्लिशिंग हाऊस , नई दिल्ली , २०१४
7. रेशमी काझी आणि आशीलद कोलस , इंडिया इन ग्लोबल न्यूक्लियर गवर्नेंस , के डब्लू पब्लिशर , फेब्रुवारी २०२३
8. महादेव अय्यर , भारतातील अणुऊर्जेची गाथा: अणुऊर्जा अजूनही सबक्रिटीकल का आहे? , लेखकप्रेस प्रकाशन , जानेवारी २०२२
9. भारत कर्नाद , इंडियास न्यूक्लियर पॉलिसी , ए बी सी - कलिओ एल एल सी प्रकाशन , ऑक्टोबर २००८
10. सिताकांत मिश्रा , परमाणु राजकारण : भारतीय राजकीय पक्ष आणि अण्वस्त्रे , कल्पज पब्लिकेशन , जानेवारी २०१५

11. दिलीप एम साळवी , होमी जे भाभा न्यूक्लियर इंडिया चे आर्किटेक , रूपा प्रकाशन , ऑगस्ट २००४

12. स्कॉट डी सागन आणि केनेथ वोल्टझ , अण्वस्त्रांचा प्रसार :एक चिरस्थायी वाद , डब्लू डब्लू नॉर्टन अँड कंपनी , २०१२

13. डॉ. ज.रा.शिंदे आणि डॉ. प्रशांत अमृतकर, समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या , चिन्मय प्रकाशन , औरंगाबाद २००५

14. अरविन्द गुप्ता , इंडिया इन चेंन्जिंग ग्लोबल न्यूक्लियर ऑर्डर , ॲकडमिक फाउंडेशन , जून २०१०

15. एस. जयशंकर , भारत मार्ग , जेनेरीक बुक्स प्रकाशन, जानेवारी २०२३

3) नियत कालिके व मासिक -

- फ्रंट लाइन,
- इंडिया टूडे,
- प्रतियोगीता दर्पण

4) Websites -

- observer research foundation,
- The Diplomat
- Embassies oindia.gov.in,
- Diplomacybeyond.com
- Britanica, www.lbpbooks.com
- ministry of external affairs
- ministry of defence
- services.india.gov.in
- pib etc .

5) News -

a) News paper -

the print , Times of India , the economic times , Hindustan times , the hindu , politico , the Indian express

b) News channel / shows - world @ 360

Prespectives, Diplomatic dispatch, The global debate,

Democracies of the world, Desh-deshantar

मार्गदर्शक
प्रा. डॉ. दत्ता एम. कुंचेलवाड
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
नागनाथ कला वाणिज्य व विज्ञान, महाविद्यालय,
औंढानागनाथ, जी. हिंगोली

संशोधक
रश्मी सखाराम बर्जे
एम.ए.,सेट (राज्यशास्त्र)